प्रेस नोट | दिनांक २८/०९/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक व खाजगी इसम | १) आरोपी लोकसेवक श्री. देवानंद रामलाल मासरकर, वय- ५२ वर्षे, प्रशासक, ग्रामपंचायत भरणे (मुळ पद-विस्तार अधिकारी, पंचायत समिती खेड) ता. खेड जि. रत्नागिरी, रा. भाडयाचे रूममध्ये- स्वामी समर्थ बिल्डींग, रूम न. २०५, २ रा मजला, काळकाई मंदिरा समोर, भरणे नाका, ता. खेड जि. रत्नागिरी.<br>२) खाजगी इसम नामे श्री. सुनिल सिताराम चिले,वय- ४० वर्षे, माजी ग्रापंचायत सदस्य, भरणे ग्रामपंचायत, ता. खेड, रा. भरणे घडशीवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | हॉटेल गणपती कृपा फॅमिली गार्डन रेस्टॉरंट, मुंबई गोवा हायवे लगत ता. खेड, जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाच रक्कम | आरोपी लोकसेवक यांनी २०,०००/-रुपये. |
| स्विकारलेला लाच रक्कमेचा पहिला हप्ता | तक्रार देण्यापुर्वी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन १०,०००/- रूपये दिनांक २५/०९/२०२० रोजी लाच रक्कम स्विकारली होती. |
| तंडजोडीअंती लाच रक्कमेची मागणी | पडताळणी कारवाईदरम्यान उर्वरित रू. १००००/- लाच रक्कमेपैकी रू. ७०००/- रक्कमेची लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | सापळा कारावाईदरम्यान लाच रक्कम रू. ७,०००/- तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक यांनी स्वत: स्विकारून खाजगी इसम यांचे संगनमतीने स्विकारलेल्या रक्कमेपैकी रू.५५००/- स्वत: कडे ठेवुन उर्वरीत रू. १५००/- खाजगी इसमास दिले. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे व्यवसायाने डॉक्टर असुन त्यांचे खाजगी क्लिनिक आहे. सदर खाजगी क्लिनिक हे लोकसेवक यांचे ग्रामपंचायत हददीत आहे. सदरचे लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक २३/०९/२०२० रोजीची नोटीस दिली होती. त्या नोटीमध्ये तक्रारदार हे शासकिय वैदयकिय अधिकारी असून ते स्वत: खाजगी वैदयकिय व्यवसाय करत आहेत व त्या खाजगी वैदयकिय व्यवसायाचे ठिकाणी गर्दी करून सामाजिक अंतर पाळले जात नसल्याची तोंडी तक्रार ग्रामस्थांकडुन प्राप्त झाली असून त्याबाबतचा खुलासा सादर न केल्यास कारवाई करण्यात येईल असे नमुद होते. सदर नोटीसीप्रमाणे कारवाई न करणेसाठी लोकसेवक यांनी तक्रार यांचेकडे रू. २०,०००/- लाच रक्कमेची मागणी केली. त्या लाच रक्कमेपैकी रू.१०,०००/- लाच रक्कमेचा स्विकार करून उर्वरित लाच रक्कम रू. १०,०००/- न दिल्यास पुढील कारवाई अटळ असल्याचे सांगितले. अशा आशयाची लेखी तक्रार तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचेकडे दिनांक २८/०९/२०२० रोजी दिली होती.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २८/०९/२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये आरोपी लोकसेवक श्री. मासरकर, प्रशासक, ग्रामपंचायत भरणे यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे भरणे नाका येथील वैदयकिय व्यवसायाचे अनुषंगाने नोटीसीप्रमाणे कारवाई न करण्यासाठी पुरक अहवाल वरिष्ठाकडे पाठविणेकरीता, याआगोदर तक्रारदार यांचेकडुन घेतलेली लाच रक्कम रू. १०,०००/- स्विकारल्याचे मान्य करून, उर्वरित लाच रक्कम रू. १०,०००/- ऐवजी तंडजोडीअंती रू. ७,०००/- लाच रक्कमेची मागणी करून त्यापैकी स्वत:करीता रू. ५०००/- व तेथे उपस्थित असलेले खाजगी इसम सुनिल सिताराम चिले, रा. भरणे घडशीवाडी यांचेकरीता रू. २०००/- लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. खाजगी इसम यांनी त्यांचा वैयक्तिक प्रभाव लोकसेवकावर पाडुन तक्रारदार यांना लाच रक्कम देण्यास भाग पाडले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झाल्यानुसार दिनांक २८/०९/२०२० रोजी सापळा आयोजित करण्यात आला असता, मागणी केलेली लाच रक्कम रू. ७,०००/- तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक यांनी स्वत: स्विकारून खाजगी इसम यांचे संगनमतीने त्यापैकी रू.५५००/- स्वत: कडे ठेवुन उर्वरीत रू. १५००/- खाजगी इसम सुनिल सिताराम चिले यांना दिल्यानंतर आरोपी लोकसेवक श्री.देवानंद |

| | |
|---|---|
| | मासरकर व खाजगी इसम श्री. सुनिल चिले यांना आज दिनांक २८/०९/२०२० रोजी १९.५८ वा सुमारास हॉटेल गणपती कृपा फॅमिली गार्डन रेस्टॉरंट येथे पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**Toll Free No :- 1064**
**Telephone No :- 02352/222893**
**Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in**
**Website :- www.acbmaharastra.gov.in**
**Mobile App :- www.acbmaharastra.net**
**Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB**

(Bijaykar)
**(नितीन भिकाजी विजयकर)**
**पोलीस उप अधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी**